राखीव वनाचे सर्व्हेक्षण, जमाबंदी व सिमांकन योजनेंतर्गत सन २०२६-२७ करिता निधी वितरीत करण्याबाबत.. (४४०६-००५३).

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक :- एस-१०/२०२६/प्र.क्र.२९५/वने-०३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : १० ऑगस्ट, २०२६.

वाचा :-

१. वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि. ९.०४.२०२६.

२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे दि.१५.०५.२०२६, दि.१५.०५.२०२६, दि.२२.०५.२०२६, दि.३०.०६.२०२६, दि. १३.०७.२०२६, दि. १६.०७.२०२६, दि. २२.०७.२०२६ व दि.२४.०७.२०२६ चे पत्र.

प्रस्तावना :-

"राखीव वनाचे सर्व्हेक्षण, जमाबंदी व सिमांकन" (४४०६ ००५३) या राज्य योजनेअंतर्गत सन २०२६-२७ साठी एकूण रु. **२०९६९.३०** लक्ष इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आला आहे.

२. प्रस्तुत योजनेअंतर्गत एकूण रु. **६७२६.५८** लक्ष निधी मागणीचा प्रस्ताव अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), नागपूर यांनी संदर्भ क्र. २ च्या पत्रान्वये शासनास सादर केला आहे.

३. वित्त विभागाच्या दि.९.०४.२०२६ रोजीच्या परिपत्रकान्वये वित्तीय वर्ष सन २०२६-२७ च्या प्रथम नऊमाहीकरीता (डिसेंबर- २०२६ अखेर) आवश्यक असणारा अनिवार्य व कार्यक्रमांतर्गत खर्चाचा अर्थसंकल्पित निधी (०२- मजूरी) एकूण वार्षिक तरतुदीच्या ६०% च्या मर्यादेत अर्थसंकल्पीय अंदाज, वाटप आणि संनियंत्रण प्रणालीवर (बीम्स) वितरीत करण्याच्या अनुषंगाने सूचना देण्यात आलेल्या आहेत.

४. आता, क्षेत्रीय कार्यालयामार्फत मागणी केलेला निधी वित्त विभागाच्या उक्त परिपत्रकाच्या मर्यादेत तसेच निधीच्या उपलब्धतेनुसार वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

शासन निर्णय:-

सन २०२६-२७ करिता "राखीव वनाचे सर्वेक्षण, जमाबंदी व सिमांकन" (४४०६ ००५३) या योजनेअंतर्गत अर्थसंकल्पीत निधीपैकी बी.डी.एस. (BDS) प्रणालीवरील उपलब्ध निधीच्या मर्यादेत एकूण **रु. २७४७.२१ लक्ष** (०२- मजुरी) इतका निधी पुढील तपशिलानुसार तसेच अटींच्या अधीन राहून वितरीत करण्यास मंजूरी देण्यात येत आहे:-

(रक्कम रु. लाखात)

अ. क्र	वनवृत्त	वन विभाग	कामाचा तपशिल	क्षेत्रीय कार्यालयाची मागणी	आतापर्यंत वितरीत निधी	वितरित रक्कम (०२- मजुरी)
१	नागपूर	भंडारा	वनहद्दीवर वर्ग। व वर्ग ॥ चे क्रॉक्रीट बाऊंड्री पिल्लर्स बसविणे,	२४५.४३	०.०	९८.१८
२		गोंदिया		३९१.५२	०.०	१५६.६१
३	गडचिरोली	वडसा		२३८.४८	०.०	९५.३९
४				२०५.०५	०.०	८२.०२
५		सिरोंचा		४११.८४	०.०	१६१.८४

			चेनलिंक फेन्सिंगची कामे / DGPS सर्व्हे			
६	चंद्रपूर	चंद्रपूर		५४१.१९	०.०	५४१.१९
७		ब्रम्हपूरी		५२९.२९	०.०	२११.७२
८	ठाणे (वन्यजीव)			२८९.९४	०.०	२८९.९४
९	नाशिक (वन्यजीव)			४५७.१९	०.०	४५७.१९
१०	पुणे (वन्यजीव)			२३०.२४	०.०	९२.१०
११	यवतमाळ	यवतमाळ		१५६१.०३	०.०	५६१.०३
एकूण						२७४७.२१

१) ज्या प्रयोजनासाठी खर्चास मंजूरी देण्यात आली आहे, त्याच प्रयोजनावर निधी खर्च करण्यात यावा.

२) चालू आर्थिक वर्षाचा उर्वरित कालावधी विचारात घेता, प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) यांनी क्षेत्रीय कार्यालयाच्या मागणी / उद्दिष्टानुसार संबंधित उप शिर्षांतर्गत निधी वितरीत करावा.

३) या मध्ये कोणत्याही प्रकारची वित्तिय अनियमितता होणार नाही, याची पुरेपूर दक्षता घेण्यात यावी.

३) वित्त विभागाने दि. ११.७.२००१ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या वित्तिय मर्यादा यापुढेही लागू राहतील.

४) सदर मान्यता ही आर्थिक वर्ष २०२६-२७ या कालावधी करिताच देण्यात येत आहे. वित्त विभागाच्या परिपत्रक दिनांक ९.०४.२०२६ मधील अटी व शर्तींचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे तसेच सदर निधी कोणत्याही परिस्थितीत खर्च न होता अधिनिस्त क्षेत्रिय अधिकारी/ मंडळे/ महामंडळे यांच्या बँक खात्यात, स्वीय प्रपंजी खात्यात अथवा शासकीय लेख्याबाहेर ठेवता येणार नाही.

५) सदर बांधकाम करताना वन (संवर्धन एंव संरक्षण) अधिनियम, १९८० चा भंग होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

६) खर्चाच्या अनुषंगाने उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्यात यावे.

७) आर्थिक वर्षाअखेर वितरीत निधी आर्णि अखर्चित निधीची पडताळणी करण्यात अखर्चित निधी तातडीने शासनखाती जमा करण्यात यावा.

८) निधी वितरीत करताना प्रस्तुत कामे दुबार होत नसल्याची खातरजमा करावी.

२. सदर खर्च हा मागणी क्रमांक- सी-१०, ४४०६ वनीकरण व वन्यजीवन यावरील भांडवली खर्च राज्य योजनांतर्गत योजना वनाचे सर्वेक्षण, जमाबंदी व सिमांकन (४४०६-००५३) या शीर्षाखाली दर्शविण्यात यावा व सन २०२६-२७ मध्ये मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. निधी खर्च करताना वित्त विभागाने मासिक निधी विवरणपत्र तसेच इतर बाबतीत दिलेल्या सूचनांचे पालन करण्यात यावे.

३. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.वि.अ.प्र.-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/ विनियम/भाग-२, दिनांक १७.०४.२०१५ भाग पहिला उप विभाग-३ परिच्छेद २७ (२) अन्वये व वित्त विभागाच्या परिपत्रक दिनांक ९.०४.२०२६ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०८१०१७५२३२३०४० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

JITENDRA S RAMGAOKAR

Digitally signed by JITENDRA S RAMGAOKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Revenue and Forests Dept,
2.5.4.20=DA1BD25BE62F91C7B60749717D63394F115854B1B30C0D7CDA850348D6A12577, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=067F696C19CDAEAD50B2E37C6C5A94DB09F968C45E35C16617050C2A9D057202, cn=JITENDRA S RAMGAOKAR
Date: 2026.08.10 17:54:11 +05'30'

(डॉ.जितेंद्र रामगावकर)
मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)

प्रत :-

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३) प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संधारण) महाराष्ट्र राज्य, नागपूर.
५) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पश्चिम मुंबई.
६) मुख्य वनसंरक्षक (प्रा.), गडचिरोली/चंद्रपूर/यवतमाळ.
७) मुख्य वनसंरक्षक (भूमी अभिलेख कक्ष), नागपूर.
८) वनसंरक्षक (प्रा.), नागपूर.
९) उप वनसंरक्षक, भंडारा/गोंदिया/वडसा/सिरोंचा/चंद्रपूर/ब्रम्हपूरी/ यवतमाळ.
१०) उप वनसंरक्षक (वन्यजीव), नाशिक /ठाणे/ पुणे.
११) महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
१२) नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
१३) वित्त विभाग, व्यय १०/ अर्थसं-६ मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
१४) कार्यासन अधिकारी (वने-०२) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१५) कार्यासन अधिकारी (अर्थसंकल्प) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१६) निवडनस्ती, कार्यासन (वने-०३), म.व व.वि., मंत्रालय, मुंबई-३२.